पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
लेखा विभाग
जा.क्रं.लेखा/१अ/कावि/502/2017
दि.31 / 05/2017

विषय :- विकास कामांच्या संदर्भात आकस्मिक खर्चाच्या ५% रकमेबाबत.

*__परिपत्रक__*

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेतील नियम क्रं.145 नुसार मुख्य बांधकामाशी संबंधीत बाबींव्यतीरिक्त नंतर उद्भवणाऱ्या अनपेक्षीत खर्चाच्या बाबींकरीता आकस्मीक खर्च या उपशिर्षाखाली अंदाजीत खर्चाच्या 5 % तरतुद करण्यात येईल.अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीकेतील नियम क्रं.150 मध्ये निविदा दर 10% किंवा रु.20000/- किंवा या पेक्षाही अधिक रकमेने कमी असतील तेव्हा अंदाजपत्रकाची पुनर्मांडणी करुन त्याचा गोषवारा नव्याने तयार करुन,गोषवाऱ्याच्या रकमेच्या 5 % इतकी रक्कम आकस्मीक खर्च म्हणुन गोषवाऱ्याच्या रकमेत समाविष्ट करण्यात यावी. अशी तरतुद आहे.

आकस्मीक खर्च म्हणुन अनपेक्षीत खर्चाच्या बाबी अपेक्षीत आहेत.यामध्ये कामाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट असलेल्या बाबी अपेक्षीत नाहीत. मात्र बहुतांश विभागांकडुन या बाबीचे पालन होत असल्याचे दिसुन येत नाही.याबाबत कोणतेही लेखापरिक्षण आक्षेप उपस्थित झाल्यास त्यास संबंधीत कार्यकारी विभाग जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

यापुढे उपरोक्त् नियम क्रं.150 नुसारची आकस्मीक खर्चाकरीताची रक्कम अंदाजपत्रकाचे गोषवाऱ्यात समाविष्ट करावयाची झाल्यास ती अंदाजपत्रकातील कामाच्या बाबींवर खर्च करण्यात येऊ नये व अशा केलेल्या खर्चाचे बाबनिहाय विवरणपत्र देयकासोबत जोडण्यात यावे. व अंदाजपत्रकातील बाबींवर असा खर्च केल्यास तो लेखाविभागाने अमान्य करावा.सदर परिपत्रकाची अंमलबजावणी सर्व विभागांनी व लेखा विभागाने परिपत्रकाचे दिनांकापासुन करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रति :- सर्व संबधित शाखाप्रमुख